# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १८/०५/२०२२ (बुधवार)

---

## अवैधरित्या गौणखनिज वाहुन नेणा—या आरोपी अटकेत स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक १७.०५.२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय बातमीदाराकडुन बातमी मिळाली कि पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील मौजा दहेगाव जोशी शिवारातुन ट्रॅक्टर ने अवैधरित्या बिनापरवाना रेती गौणखनिज ची चोरटी वाहतुक होत आहे. अश्या माहीती कन्हान नदी ते दहेगाव या कच्च्या मातीचा रोड येथे सापळा रचुन अवैधरित्या बिनापरवाना रेती ची वाहतुक करणारे ट्रॅक्टर ताब्यात घेवुन ट्रॅक्टर चालक व मालक आरोपी नामे— दिगांबर कृष्णाजी गभणे वय ५० वर्ष रा दहेगाव ता पारशिवनी यांचे विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच आरोपी यांचेकडुन **एक ट्रॅक्टर क्र एम एच ४० एउ ६८ कि ५,००,०००/—रू व एक ब्रास रेती कि ४०००/—असा एकुण ५,०४,०००/—रू चा माल जप्त केला.**

सदरची कारवाई श्री विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण तसेच श्री राहुल माकणीकर अपर पोलीस अधिक्षक ना.ग्रा यांचे आदेशाने स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री राजीव कर्मलवार, सफौ चंद्रशेखर गडेकर, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, रोहन डाखोरे, चापोहवा अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे**.

## अवैधरित्या गौणखनिज वाहुन नेणा—या आरोपीविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन अरोली — अंतर्गत कोदामेढी ०३ कि.मी. पुर्व दिनांक १७/०५/२०२२ चे ०३/१५ वा. ते ०३/४५ वा. दरम्यान आरोपी क्र. **१)** टीप्पर क्र एम.एच.—३६—एफ— १८०१ चा चालक प्रमोद जानबाजी चापले वय ४४ वर्ष रा. इंदीरा नगर कन्हान जि.नागपुर व आरोपी क्र **३)** टीप्पर क्र एम.एच.—४०—बी एल—८०७०चा चालक संदीप शामराव पानतावणे वय ३४ वर्ष रा. चाचेर ता. मौदा जि.नागपुर यांनी आरोपी क्र. **२)** टीप्पर मालक राजा यादव रा. कन्हान जि.नागपुर व **४)** टीप्पर मालक कैलास माणिकराव बरबटे रा. चाचेर ता.मौदा जि.नागपुर यांचे सांगितलेवरून त्यांचे ताब्यातील नमुद वाहनामध्ये (एकुण किमती ४०,००,००० रू.) प्रत्येकी **०३ ब्रास गौण खनिज (मुरुम) एकुण ०६ ब्रास गौण खनिज (मुरुम) एकुण किमती ३६,०००/—रू. असा एकुण ४०,३६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पो.ना. अमोल इंगोले पो.स्टे.अरोली यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन अरोली येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३७९, १०९ भा.दं.वि. अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास स.पो.नि. जोशी पो.स्टे.अरोली मो. क्र. ७८७५९६६६७६ हे करीत आहेत.

## रिलायन्स टॉवरला लावलेले सामान चोरी

पोलीस स्टेशन देवलापार :— अंतर्गत मौजा पवनी ७ किमी दक्षिण. यातील फिर्यादी ही रिलायन्स टावर कंपनीची ठेकेदार (कॉंट्रेक्टर) असुन त्यांनी मार्च महीण्यात २०२० मध्ये देवलापार हद्दीतील पवनी गावात रिलायन्सचे टॉवर उभारले होते. ते दिनांक १०/०३/२२ ते १७/०५/२२ चे ११.०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने **रिलायन्स टॉवर ला लावलेले सेप्टी मॉडेल चॅनल मीटर, बॅटरी असा एकुण ३५,०००/— रू चा माल** चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ कल्पना महेश देशमुख वय ४२ रा. अकोले जि. अहमदनगर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे देवलापार येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पोना/ संदिप नागोसे पो.स्टे.देवलापार मो.नं. ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

## टॉवरमध्ये लागलेल्या बॅटरी चोरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत मौजा रीधोरा ८ की मी दक्षिण. यातील फिर्यादी हे टॉवरचे पेट्रोलीग करीत असता त्यांना टॉवरला लागलेल्या अमर राजा कंपनिच्या सेल्टर बॉक्स मधील जुन्या वापरत्या २४ बॅटरी पैकी १२ बॅटरी दिसुन आल्या नाही. दि १५.०५.२२ चे रात्री ०१.०० वा ते ०२.०० वा दरम्यान **फिर्यादीचे इन्टेक्स कपंनिचे टॉवरचे १२ बॅटरी किमंत १२०००/— रू कोणीतरी अज्ञात चोराने** चे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पवन सुधाकराव मोरे वय ३४ वर्ष रा वानाडोगरी नागपुर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे काटोल येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास पो ना सुनिल ठोबरे मो न ७४९८६५७९६३ हे करीत आहे.

## बस चोरून नेणारा आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन बोरी** :— अंतर्गत मौजा असोला शिवार वर्धा रोड सुरज ढाबा १४ किमी पश्चिम. दिनांक १६.५.२२ चे २१.३० वा ते २२.०० वा यातील फिर्यादी हा आपल्या मित्रासह मौजा असोला शिवार वर्धा रोड सुरज ढाबा येथे आपली स्कुल बस उभी करून जेवणाकरिता थांबले असता यातील फिर्यादी मोबाईल स्कुल बसमध्ये चार्जिंगला लावला, त्यामुळे स्कुल बसला चाबी लावलेली होती, यातील आरोपी याने सदर विनानंबरची स्कुल बस किं १५ लाख व मोबाईल किं २,०००/— रू असा एकुण १५०२०००० /—रू चा माल घेउन पळुन गेला,सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी ११२ डायल वर कॉल करून पोस्टेला माहिती दिल्याने व त्याचा मोबाईल बसमध्ये असल्याचे सांगितल्याने सायबर सेल यांच्याशी संपर्क करून वाहनाचा पाठलाग करित असता चोरीस गेलेल्या वाहनासह आरोपी हा जुना काची रोड राजु गांधी चौक ओव्हर ब्रीजचे खाली कळमना रोड नागपुर येथे मिळुन आल्याने गुन्हयातील चोरी गेलेले वाहन **टाटा कंपनीची बस किं १५,००,०००/— रू व मोबाईल २०,०००/— रू चा आयटेल कंपनीचा कि पॅड मोबाईल असा जप्त केला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुरज हमीप्रसाद शर्मा वय ४२ वर्ष रा.ब्लॉक कॉलनी खैर कसीसो रोड ता.खैर जि.अलिगढ उत्तरप्रदेश यांचे रिपोर्टवरुन पोस्टे बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केलेला असून सदर गुन्हयातील आरोपी नामे— सुधीर कुमार चंद्रवंशी वय २० वर्ष रा.पंढुआ बंका थाणा मेराल जि.गडवा झारखंड यांना अटक करण्यात आली. पुढील तपास पो हवा असलम पोस्टे बोरी मो नं ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कन्हांन :–** अंतर्गत घागरा घाट कन्हान १ किमी दक्षीन, दिनांक १७/५/२०२२ चे ०७/०० वा दरम्यान यातील मृतक नामे– आमीर वल्द मो बशीर शेख वय २७ रा ताजनगर टेकानाका हे याचे मुस्लीम समाजाचे धार्मीक ग्रंथ विसर्जन करन्याकरिता कन्हान नदीचा घागरा घाटाजवळ आले असता मृतक हा जास्त पानी असलेल्या ठिकानी पुस्तके विसर्जन करन्याकरिता गेला असता पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहेत.

## गळफास घेवुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत संकेत लॉज सावनेर ०१ किमी पुर्व, दिनांक १७/०५/२०२२ चे १२/०० वा. ते १३/०० वा. दरम्यान यातील मृतक याने अज्ञात कारणावरुन संकेत लॉज सावनेर चे रुममध्ये येवून सिलींग फॅनला चादरीने गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेन्द्र बाबाराव खंदारे वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र ५ सटवा माता मंदीर सावनेर यांचे रिपोर्टवरून पो स्टे सावनेर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास सफौ अनिल तिवारी मो क्र ९६८९८९१४८६ पोलीस स्टेशन सावनेर करीत आहेत

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**